सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता “डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटींकाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण” आणि “उच्च तंत्रज्ञानाद्वारे रोपे निर्मितीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर रोपवाटीका निर्मिती” (२४०६ ८६१३) लेखाशीर्षांतर्गत अनुदान वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः सावनि-२०१९/प्र.क्र.८६/फ-११
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२.०७.२०१९

वाचा :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर, यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/नबाप्र/ प्र.क्र.११/५५६ /३१८/२०१९- २०, दि. ०८.०७.२०१९ चे पत्र.

२) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्रमांक- अर्थसं-२०१९/प्र.क.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९

प्रस्तावना :-

सामाजिक वनीकरणाचे महत्व लक्षात घेऊन वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरीता सामाजिक वनीकरणांतर्गत **“डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटींकाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण आणि उच्च तंत्रज्ञानाद्वारे रोपे निर्मितीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर रोपवाटीका निर्मिती (२४०६ ८६१३)**” या योजनेंतर्गत सन २०१९-२० करिता खालीलप्रमाणे निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटीका बळकटीकरण व उच्च तंत्रज्ञानाद्वारे रोप निर्मितीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर रोपवाटीका निर्मितीसाठी	५०- इतर खर्च	एकूण
मुळ अर्थसंकल्पित रक्कम	२०००.००	२०००.००
पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित (जुलै २०१९)	२१६०.००	२१६०.००
एकूण	४१६०.००	४१६०.००

सदर योजनेसाठी रु.४७३९.५९ लक्ष इतका निधी चालू बाब प्रस्तावांतर्गत वितरित करण्याची विनंती प्रधान मुख्य वनसरंक्षक, (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये केली आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीच्या ६०% रक्कम एप्रिल २०१९ ते डिसेंबर २०१९ अखेर ९ महिन्यांच्या कालावधीकरीता खर्च करण्यास वित्त विभागाच्या वित्त विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील दि.०७.०८.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मूळ अर्थसंकल्पित निधीच्या (रु.२०००.०० लक्ष च्या) ६० % म्हणजेच रु. १२००.०० लक्ष निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या वित्तीय वर्षात सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या **“डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटींकाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण” आणि “उच्च तंत्रज्ञानाद्वारे रोपे निर्मितीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर रोपवाटीका निर्मिती ” (२४०६ ८६१३)**” या योजनेसाठी मूळ अर्थसंकल्पित निधीच्या

(रु. २०००.०० लक्ष च्या) ६० % म्हणजेच रु. १२००.०० लक्ष (५०- इतर खर्च) निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

४. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे. तसेच सदर योजनेंतर्गत सन २०१८-१९ मध्ये केलेल्या कामांवरील खर्चाचे विवरण सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून निधी वितरित करण्यात यावा.

५. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत व्हावे.

६. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून वित्त विभागाच्या संदर्भिय दिनांक ०८.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून खर्ची टाकण्यात यावा.

७. **सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.**

> "मागणी क्र.सी-७,
> २४०६ वनीकरण व वन्यजीवन, (योजनांतर्गत)
> (०३) (०४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय रोपवाटीकांचे बळकटीकरण व आधुनिकीकरण-
> उच्च तंत्रज्ञानाद्वारे रोपे निर्मितीसाठी जिल्हा व तालुकास्तरावर रोपवाटीका निर्मिती".
> (२४०६ ८६१३)- ५० इतर खर्च

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थसं-३, दि.०८.०७.२०१९ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२२१७२५५९६५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA
RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.07.22 17:33:33 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (मंत्रालय)

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
५. वनसरंक्षक , सामाजिक वनीकरण (६ वृत्त)
६. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
७. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
१०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
११. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती/फ-११.